**रेग्युलर मुकदमा क्र.३४२/२०१२**

**आदेश निशाणी क्र.१०९ वर**

१. प्रस्तुत अर्ज आज रोजी दुपारी ०३-०० वाजता वादीचे वकीलांनी सादर केला. प्रतिवादी क्र.२/२, २/४ ते २/१० व ५ यांना व त्यांचे वकीलांना दुपारी ०५-१० पर्यंत सतत पुकारले असता उपस्थित नाहीत. त्यांनी अर्जास म्हणणे सादर करण्याचा आदेश केला आहे. वादींचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. दावा कथन व यापूर्वीचा दिवाणी दावा यावरून वादी व प्रतिवादी यांचेत सन १९९५ पासून वाद सुरू असल्याचे दिसून येते. प्रस्तुत दाव्यातील निशाणी ५ अर्जावर दिनांक २०-०१-१९९८ रोजी आदेश पारीत करून वादी व प्रतिवादी यांनी निशाणी ५ अर्ज सुनावणीपर्यंत जैसे थे परिस्थिती ठेवावी असा आदेश पारीत झाला होता. दिनांक १५-०९-१९९९ रोजीचे आदेशावरून वादी व त्यांचे वकील गैरहजर असल्याने तसेच अर्ज चालविण्याबाबत प्रगती न केल्याने जैसे थे आदेश मागे घेण्याचा आदेश केला आहे. सन २०१८ साली भूखंड वाटपाबाबत वाटपपत्र व भाडेपट्टा करार सिडकोने पारीत केल्याचे दिसून येते.

२. वादी व प्रतिवादी यांचे सर्व वादप्रश्न यावर उभयपक्षाचे म्हणणे ऐकून निर्णय घेणे बाकी आहे. प्रस्तुत अर्जात नमूद केलेली कारणे व वरील कारणे याचा विचार करून वादी व प्रतिवादी क्र. २/२, २/४ ते २/१० व ५ यांना आदेशीत करण्यात येते की, पुढील दिनांकापर्यंत दावा मिळकतीची परिस्थिती आहे तशीच म्हणजे जैसे थे ठेवावी. वादीस आदेशीत करण्यात येते की, प्रकरण जुने असल्याने दावा व निशाणी ५ सुनावणीस मुदत न घेता सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी. निशाणी ५ अर्जावर

सुनावणी घेवून सकृतदर्शनी बाजू, न्यायाचा समतोल व मनाई आदेश न दिल्यास नुकसान कोणाचे होईल यावर निष्कर्ष नोंदवून निशाणी ५ व प्रस्तुत निशाणी १०९ वर आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पनवेल,
दिनांक : १२-०८-२०२२.

(के.एम.सोनवणे)
३रे सह दिवाणी न्यायाधीश
वरीष्ठ स्तर पनवेल.